2 8 AUG 2026

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संवाद, जनजागृतीतून तृतीयपंथींचे समावेशन शक्य

## कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांचे मत

**कोल्हापूर** : संवाद आणि जनजागृती या माध्यमातून तृतीयपंथी नागरिकांचे मुख्य प्रवाहात समावेशन करण्यासाठी सार्वत्रिक प्रयत्नांची गरज आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी केले. शिवाजी विद्यापीठात गुरुवारी सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, कोल्हापूर आणि विद्यापीठाचे सामाजिक समावेशन अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'तृतीयपंथीय कल्याण, हक्क व संरक्षण कायदा २०१९ व सुधारित नियम २०२०' यांच्या अंमलबजावणीसंदर्भात आयोजित एकदिवसीय कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. कामत बोलत होते.



कुलगुरू डॉ. कामत म्हणाले, तृतीयपंथी समुदायातील अनेक व्यक्ती सामाजिक भीती अथवा संकोचामुळे आपली ओळख उघडपणे मांडत नाहीत. त्यामुळे त्यांच्यापर्यंत पोहोचून त्यांचे अनुभव, अडचणी आणि अपेक्षा समजून घेणे तसेच समाजाने त्यांचा स्वीकार करणे आवश्यक आहे. तृतीयपंथी समुदाय हा समाजाचा उपेक्षित नव्हे, तर अविभाज्य घटक असून, त्यांच्या हक्कांसाठी आणि सक्षमीकरणासाठी काम करणे ही समाजाची जबाबदारी आहे.

यावेळी शासनाच्या तृतीयपंथी हक्क कल्याण समिती सदस्या मयुरी आळवेकर यांनी, शिवाजी विद्यापीठाने तृतीयपंथीयांना उच्च शिक्षणाच्या प्रवाहात सामावून घेतले आहे. तथापि, व्यापक समाजाने तृतीयपंथीयांना वेगळे न पाहता त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात सामावून घ्यावे आणि त्यांना आवश्यक ते सहकार्य करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, सामाजिक समावेशन केंद्राचे संचालक डॉ. मुरलीधर भानारकर यांनी शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले. यावेळी समाज कल्याणचे सहायक आयुक्त सचिन साळे यांनी प्रास्ताविक केले. समाज कल्याणचे तालुका समन्वयक सचिन परब यांनी सूत्रसंचालन केले, तर समाज कल्याण अधिकारी अक्षय कुरणे यांनी आभार मानले. कार्यक्रमाला जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. रेश्मा पाटील, पोलीस अधिकारी अंजली केसरकर यांच्यासह डॉ. किशोर खिलारे, डॉ. दीपक भोसले, डॉ. सरोज बीडकर आदी उपस्थित होते.

### तृतीयपंथी समजून घेताना...

दरम्यान, दिवसभरातील सत्रांमध्ये तृतीयपंथीय नागरिकांच्या समस्या, त्यांचे निराकरण, त्यांना सहकार्य आणि कायदेशीर मदत या अनुषंगाने महत्त्वपूर्ण चर्चा झाली. कोल्हापूर जिल्हास्तरीय तृतीयपंथी हक्क व तक्रार निवारण समिती सदस्य शिवानी गजबर यांनी 'तृतीयपंथी समजून घेताना...' या विषयावर सादरीकरण केले. त्यानंतर 'तृतीयपंथी कायदे व धोरणांबाबत सामाजिक जागृती' विषयावर अविनाश भाले यांनी मार्गदर्शन केले.

2 8 AUG 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तृतीयपंथी समुदायाच्या सक्षमीकरणाची जबाबदारी समाजाची : डॉ. आर. के. कामत

कोल्हापूर, ता. २७ : तृतीयपंथी समुदाय हा समाजाचा अविभाज्य घटक असून, त्यांच्या हक्क, सक्षमीकरणासाठी काम करणे ही समाजाची जबाबदारी आहे. तृतीयपंथी नागरिकांसाठी संवेदनशील वातावरण, सर्वसमावेशक पायाभूत सुविधा, शैक्षणिक व रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी विद्यापीठ कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी आज केले.



डॉ. आर. के. कामत

सहायक आयुक्त समाजकल्याण कार्यालय, विद्यापीठाच्या सामाजिक समावेशन अभ्यास केंद्रातर्फे 'तृतीयपंथीय कल्याण, हक्क व संरक्षण कायदा २०१९ व सुधारित नियम २०२०' यांच्या अंमलबजावणीबाबत विद्यापीठात घेतलेल्या कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. कामत बोलत होते.

शासनाच्या तृतीयपंथी हक्क कल्याण समिती सदस्य मयुरी आळवेकर, सामाजिक समावेशन केंद्राचे संचालक डॉ. मुरलीधर भानारकर यांनी मनोगत व्यक्त केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. रेश्मा पाटील, पोलिस अधिकारी अंजली केसरकर, किशोर खिलारे, दीपक भोसले, सरोज बिडकर उपस्थित होते. शिवानी गजबर यांनी 'तृतीयपंथी समजून घेताना...' या विषयावर सादरीकरण केले. 'तृतीयपंथी कायदे व धोरणांबाबत सामाजिक जागृती' या विषयावर अविनाश भाले यांनी मार्गदर्शन केले. समाजकल्याणचे सहायक आयुक्त सचिन साळे यांनी स्वागत केले. तालुका समन्वयक सचिन परब यांनी सूत्रसंचालन केले. समाजकल्याण अधिकारी अक्षय कुरणे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हा
2 8 AUG 2026
जनप्रवास


# जनजागृतीतून तृतीयपंथीयांचे समावेशन शक्य

**जनप्रवास : कोल्हापूर**

संवाद आणि जनजागृती या माध्यमातून तृतीयपंथी नागरिकांचे मुख्य प्रवाहात समावेशन करण्यासाठी सार्वत्रिक प्रयत्नांची गरज आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी केले.

विद्यापीठात सहायक आयुक्त, समाजकल्याण कार्यालय, कोल्हापूर आणि विद्यापीठाचे सामाजिक समावेशन अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते. 'तृतीयपंथीय कल्याण, हक्क व संरक्षण कायदा २०१९ व सुधारित नियम २०२०' हा या कार्यशाळेचा विषय होता. अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. कामत बोलत होते.

कुलगुरू डॉ. कामत म्हणाले, राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या भूमीत सामाजिक समतेची मुहूर्तमेढ रोवली गेली. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून सन्मानाने जगण्याचा मूलभूत अधिकार दिला. कायद्यात अधिकारांची तरतूद आहे. तरी समाजात त्याबाबत व्यापक जनजागृती आणि सातत्यपूर्ण संवादाची गरज आहे. तृतीयपंथी समुदायातील अनेक व्यक्ती सामाजिक भीती अथवा संकोचामुळे आपली ओळख उघडपणे मांडत नाहीत. त्यामुळे त्यांच्यापर्यंत पोहोचून त्यांचे



शिवाजी विद्यापीठात आयोजित कार्यशाळेत सादरीकरणाद्वारे मार्गदर्शन करताना गजबर.

अनुभव, अडचणी आणि अपेक्षा समजून घेणे तसेच समाजाने त्यांचा स्वीकार करणे आवश्यक आहे. तृतीयपंथी बांधवांसाठी पायाभूत सुविधा, शैक्षणिक व रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी विद्यापीठ कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

मयुरी आळवेकर म्हणाल्या, शिवाजी विद्यापीठाने तृतीयपंथीयांना उच्चशिक्षणाच्या प्रवाहात सामावून घेतले आहे. त्यांना वेळोवेळी उद्‌भवणाऱ्या समस्या सोडविण्यातही पुढाकार घेतला आहे. समाजाने तृतीयपंथीयांना वेगळे न पाहता त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात सामावून घ्यावे. आवश्यक ते सहकार्य करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

## तृतीयपंथी समजून घेताना

दिवसभरात झालेल्या विविध सत्रांमध्ये तृतीयपंथीय नागरिकांच्या समस्या, त्यांचे निराकरण, त्यांना सहकार्य आणि कायदेशीर मदत या अनुषंगाने महत्त्वपूर्ण चर्चा झाली. कोल्हापूर जिल्हास्तरीय तृतीयपंथी हक्क व तक्रार निवारण समिती सदस्य शिवानी गजबर यांनी 'तृतीयपंथी समजून घेताना...' या विषयावर अतिशय अंतर्मुख करणारे सादरीकरण केले. त्यानंतर 'तृतीयपंथी कायदे व धोरणांबाबत सामाजिक जागृती' या विषयावर अविनाश भाले यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

शिवानी गजबर, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. रेश्मा पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. मुरलीधर भानारकर यांनी मनोगते व्यक्त केले. समाजकल्याणचे सहायक आयुक्त सचिन साळे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. समाजकल्याणचे तालुका समन्वयक सचिन परब यांनी सूत्रसंचालन केले. समाजकल्याण अधिकारी अक्षय कुरणे यांनी आभार मानले. यावेळी पोलीस अधिकारी अंजली केसरकर, डॉ. दीपक भोसले, डॉ. सरोज बीडकर आदी उपस्थित होते.

2 8 AUG 2026

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
गवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महिलांना सुरक्षिततेची जाणीव असणे आवश्यक

## प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव

कोल्हापूर : प्रतिनिधी

महिलांनी स्वतःच्या क्षमतांवर विश्वास ठेवून शिक्षण, विज्ञान-तंत्रज्ञान, रोजगार आणि समाजातील विविध क्षेत्रांत पुढे यावे, यासाठी त्यांना उपलब्ध संधी, सुविधा आणि हक्कांची माहिती असणे आवश्यक आहे. महिलांचा आत्मविश्वास आणि स्वावलंबन वाढविण्यासोबतच समाजातील प्रत्येक क्षेत्रात त्यांचा सहभाग वाढविण्यासाठी संवाद आणि मार्गदर्शनाची गरज आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी केले. महिलांना सक्षमीकरणाच्या दिशेने प्रेरित करणाऱ्या 'शी टॉल्क' सारख्या उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित करताना त्या बोलत होत्या.



कोल्हापूर : कायदेविषयक कार्यक्रमात बोलताना प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव. मंचावर डॉ. माधुरी वाळवेकर, डॉ. प्रतिभा देसाई, डॉ. ज्योती खराडे.

शिवाजी विद्यापीठाचे विद्यार्थिनी वसतिगृह आणि स्वयंसिद्धा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'शी टॉल्क' उपक्रमात बोलताना डॉ. जाधव म्हणाल्या, महिलांना उपलब्ध असलेल्या विविध संधी, सुविधा, हक्क आणि सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन करून त्यांच्यामध्ये आत्मविश्वास, स्वावलंबन आणि निर्णयक्षमता निर्माण करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. त्यामुळे महिलांनी उपलब्ध संधींचा केवळ लाभ न घेता स्वतःच्या क्षमता ओळखून आत्मनिर्भर होण्याची दिशा स्वीकारावी.

डॉ. प्रतिभा देसाई यांनी 'स्वयंसिद्धा' या महिलांसाठीच्या ॲपची माहिती देताना महिलांनी केलेले उपक्रम, मिळविलेले यश तसेच महिलांनी सामूहिकपणे राबविलेले उल्लेखनीय उपक्रम या माध्यमातून इतरांपर्यंत पोहोचविता येत असल्याचे सांगितले. तसेच 'स्त्रीशक्ती पोर्टल'वर नोंदणीची प्रक्रिया आणि त्याचा उपयोगाबाबत त्यांनी मार्गदर्शन केले.

विद्यार्थिनी वसतिगृहाच्या मुख्य अधीक्षक डॉ. माधुरी वाळवेकर यांनी कार्यस्थळी महिलांच्या लैंगिक छळापासून संरक्षणासाठी असलेल्या 'पिओएसएच' कायद्याबाबत मार्गदर्शन केले. सुरक्षित कार्यस्थळ, महिलांचे कायदेशीर अधिकार, लैंगिक छळाच्या तक्रारींसाठी उपलब्ध यंत्रणा तसेच तक्रार निवारणाची प्रक्रिया याबाबत त्यांनी माहिती दिली.

साक्षी धनावडे यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी डॉ. नीलांबरी जगताप, डॉ. कविता वड्राळे, डॉ. मीना पोतदारआदी उपस्थित होत्या. डॉ. ज्योती खराडे यांनी आभार मानले.

28 AUG 2026

जनप्रवास



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थिनी वसतिगृहात आयोजित कायदेविषयक कार्यक्रमात बोलताना प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव. सोबत डॉ. माधुरी वाळवेकर, डॉ. प्रतिभा देसाई, डॉ. ज्योती खराडे.

# हक्क, सुरक्षिततेची जाणीव करून देण्यावर भर : प्र-कुलगुरू डॉ. जाधव

**जनप्रवास : कोल्हापूर**

महिलांनी स्वतःच्या क्षमतांवर विश्वास ठेवून शिक्षण, विज्ञान-तंत्रज्ञान, रोजगार आणि समाजातील विविध क्षेत्रांत पुढे यावे, यासाठी त्यांना उपलब्ध संधी, सुविधा आणि हक्कांची माहिती असणे आवश्यक आहे. महिलांचा आत्मविश्वास आणि स्वावलंबन वाढविण्यासोबतच समाजातील प्रत्येक क्षेत्रात त्यांचा सहभाग वाढविण्यासाठी संवाद आणि मार्गदर्शनाची गरज आहे, असे मत प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी मांडले.

शिवाजी विद्यापीठाचे विद्यार्थिनी वसतिगृह आणि स्वयंसिद्धा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'सी टाल्क' उपक्रमात त्या बोलत होत्या.

डॉ. जाधव म्हणाल्या, महिलांना उपलब्ध असलेल्या विविध संधी, सुविधा, हक्क आणि सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन करून त्यांच्यामध्ये आत्मविश्वास, स्वावलंबन आणि निर्णयक्षमता निर्माण करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. त्यामुळे महिलांनी उपलब्ध संधींचा केवळ लाभ न घेता स्वतःच्या क्षमता ओळखून आत्मनिर्भर होण्याची दिशा स्वीकारावी. डॉ. प्रतिभा देसाई यांनी 'स्वयंसिद्धा' या महिलांसाठीच्या ॲपची माहिती दिली. महिलांनी सामूहिकपणे राबविलेले उल्लेखनीय उपक्रम या माध्यमातून इतरांपर्यंत पोहोचविता येत असल्याचे सांगितले. तसेच 'स्त्रीशक्ती पोर्टल'वर नोंदणी करण्याची प्रक्रिया आणि त्याचा उपयोग याबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थिनी वसतिगृहाच्या मुख्य अधीक्षक डॉ. माधुरी वाळवेकर यांनी कार्यस्थळी महिलांच्या लैंगिक छळापासून संरक्षणासाठी असलेल्या 'POSH' कायद्याबाबत मार्गदर्शन केले. सुरक्षित कार्यस्थळ, महिलांचे कायदेशीर अधिकार, लैंगिक छळाच्या तक्रारींसाठी उपलब्ध यंत्रणा तसेच तक्रार निवारणाची प्रक्रिया याबाबत त्यांनी माहिती दिली. साक्षी धनावडे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. ज्योती खराडे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. नीलांबरी जगताप, डॉ. कविता वड्राळे, डॉ. मीना पोतदार, विद्यार्थिनी वसतिगृहातील कर्मचारी आणि विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

2 8 AUG 2026

सकाळ

# महिलांनी आत्मनिर्भर व्हावे : डॉ. जाधव

कोल्हापूर, ता. २७ : महिलांनी उपलब्ध संधींचा केवळ लाभ न घेता स्वतःच्या क्षमता ओळखून आत्मनिर्भर होण्याची दिशा स्वीकारावी, असे आवाहन प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थिनी वसतिगृह आणि स्वयंसिद्धा यांच्यातर्फे झालेल्या 'ती बोलते' (She Talk) या उपक्रमात त्या बोलत होत्या. डॉ. प्रतिभा देसाई यांनी 'स्वयंसिद्धा' या महिलांसाठीच्या ॲपची माहिती दिली. 'स्त्रीशक्ती पोर्टल'वर नोंदणी करण्याची प्रक्रिया आणि त्याचा उपयोगाबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थिनी वसतिगृहाच्या मुख्य अधीक्षक डॉ. माधुरी वाळवेकर यांनी कार्यस्थळी महिलांच्या लैंगिक छळापासून संरक्षणासाठी असलेल्या कायद्याबाबत मार्गदर्शन केले.

डॉ. नीलांबरी जगताप, कविता वड्राळे, मीना पोतदार उपस्थित होत्या. साक्षी धनावडे यांनी सूत्रसंचालन केले. ज्योती खराडे यांनी आभार मानले.

2 8 AUG 2026

सिंधुदुर्ग समाचार

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचे काळसेकर काव्य पुरस्कार प्रभा गणोरकर आणि रवी कोरडे यांना जाहीर

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणारा सन २०२६ चा 'सतीश काळसेकर काव्य पुरस्कार' ज्येष्ठ कवयित्री प्रभा गणोरकर यांना तर 'ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार' रवी कोरडे यांना जाहीर करण्यात आला आहे. नियतकालिकांच्या संपादन व लघुनियतकालिक चळवळीत सक्रीय सहभाग असणाऱ्या सतीश काळसेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा पुरस्कार देण्यात येतो. शिवाजी विद्यापीठात लवकरच पुरस्कार प्रदान सोहळा आयोजित करण्यात येईल, अशी माहिती डॉ. रणधीर शिंदे यांनी दिली आहे.



काळसेकर कुटुंबियांच्या वतीने सतीश काळसेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिलेल्या देणगीतून काव्य क्षेत्रात मौलिक योगदान देणाऱ्या कवींना 'सतीश काळसेकर काव्य पुरस्कार' देण्यात येतो. रुपये २१,०००/- आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. तर, आश्वासक कविता लेखन करणाऱ्या तरुण कवीला 'ऋत्विज काळसेकर पुरस्काराने' सन्मानित करण्यात येते. या पुरस्काराचे स्वरूप रुपये १०,०००/- आणि सन्मानचिन्ह असे आहे.

'सतीश काळसेकर काव्य पुरस्कार' ज्येष्ठ कवयित्री व समीक्षक प्रभा गणोरकर यांना देण्यात येत आहे. प्रभा गणोरकर या मूळच्या अमरावती येथील असून मराठीतील ज्येष्ठ कवयित्री आणि समीक्षक म्हणून त्यांची साहित्यविश्वाला ओळख आहे. त्यांचे 'विवर्त', 'व्यतीत' व 'व्यामोह' हे कवितासंग्रह प्रकाशित आहेत. गणोरकर



यांची कविता पुरुषी पर्यावरणात स्त्रियांच्या वाट्याला आलेल्या यातनामय आयुष्याचे अत्यंत गंभीर व संयत स्वरात केलेलं आर्त प्रकटन आहे. आधुनिक स्त्रीची संवेदनशीलता व तिच्या अस्तित्वाशी निगडीत वेगवेगळे प्रश्न गणोरकर यांच्या कवितेतून अभिव्यक्त झाले आहेत. निसर्ग आणि सृष्टीविषयीचे एक वेगळे संवेदन त्यांच्या काव्यसृष्टीत आहे.

नव्या पिढीतील आश्वासक काव्य लेखनासाठी दिला जाणारा 'ऋत्विज काळसेकर पुरस्कार' हा छत्रपती संभाजीनगर येथील कवी रवी कोरडे यांना जाहीर झाला. त्यांचे 'धूसर झालं नसतं गाव', 'भुंड्या डोंगरांचे दिवस' हे महत्वाचे कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. कृषी जीवनातील पडझड, ग्रामीण व मानवी जीवनातील गुंतागुंत, ग्रामीण माणसाचे मातीशी असणारे घट्ट नाते, हरवलेल्या भूतकाळ व मातीवरील गाढ निष्ठेची ही कविता आहे. रवी कोरडे यांना यापूर्वी युवा साहित्य अकादमी पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

काळसेकर काव्यपुरस्काराचे हे पाचवे वर्ष असून सतीश काळसेकर काव्य पुरस्कार यापूर्वी वसंत आबाजी डहाके, नारायण कुलकर्णी-कवठेकर, अनुराधा पाटील, अरुणचंद्र गवळी यांना देण्यात आला आहे. तर ऋत्विज काळसेकर पुरस्कार दिशा पिंकी शेख, वर्जेश सोळंकी, वीरधवल परब, फेलिक्स डिसोजा यांना देण्यात आला आहे. पुरस्कार निवड समितीचे प्रा. नीतीन रिंढे (मुंबई), प्रा. नंदकुमार मोरे (कोल्हापूर) व प्रा. रणधीर शिंदे यांनी काम पाहिले.

2 8 AUG 2026

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
ज्ञानमेवामृतम्
Estd. 1962
"A++" Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

Best Compliments from

# Shivaji University, Kolhapur

## Department of Computer Science

### Courses Offered

- B.Sc. - M.Sc. (AI & ML) Integrated
- Bachelor of Computer Applications
- Master of Computer Applications (MCA)
- M.Sc. Computer Science
- Post Graduate Diploma in Data Science (PGDDS)
- B.Sc. Cyber Security & Digital Forensics

### Salient Features

- Hands on Teaching Learning
- Well Qualified Faculty
- Well Equipped Labs
- Invited Talks by Industry Experts

### Contact Details

Department of Computer Science,
School of Engineering &
Technology Building.
Shivaji University,
Kolhapur - 416 004
Email : csd@unishivaji.ac.in
Ph. 0231 - 2609347

**Dr. V. N. Shinde**
**Registrar**
**Date : 28/08/2026**

